REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 10 | JULY - 2025

# "छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शहरातील बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांमधील नेतृत्व गुण - एक अभ्यास"

डॉ. शेख रुखसाना अजीज
प्राचार्य,
औरंगाबाद बी.एड. कॉलेज, छत्रपती संभाजीनगर.

## प्रस्तावना :-



नेतृत्व म्हणजे एक सामान्य ध्येय साध्य करण्यासाठी लोकांच्या समूहावर प्रभाव टाकण्याची आणि मार्गदर्शन करण्याची क्षमता. यामध्ये अनेक कौशल्ये आणि वर्तणूक समाविष्ट आहेत जी व्यक्तींना दिशा देण्यासाठी, कार्यसंघ सदस्यांना प्रेरित करण्यासाठी, निर्णय घेण्यास, सहयोग वाढवण्यासाठी आणि वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी सक्षम करतात. यशस्वी नेत्यांमध्ये प्रामाणिकपणा, स्पष्ट संवाद, जबाबदारी, दूरदृष्टी आणि आत्म-जागरूकता यासारखे गुण असतात ज्या मुले ते इतरांपेक्षा वेगळे असतात ते निर्णय घेण्यामध्ये, इतरांना सक्षम बनवण्यात, सर्जनशीलतेला चालना देण्यात आणि त्यांच्या संघांना प्रेरित आणि प्रेरणा देण्यात उत्कृष्ट असतात

नेतृत्व आणि बी.एड.चा ज्यावेळेस आपण विचार करतो तेव्हा येथे भावी शिक्षकास विद्यार्थी, पालक व शालेय व्यवस्थापन या सर्वांना घेउन चालावे लागते बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांमधील नेतृत्व गुण म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षकी पेशासाठी आवश्यक असलेले नेतृत्व कौशल्ये विकसित करणे. यामध्ये प्रभावी संवाद, सहानुभूती, निर्णय क्षमता, आणि विद्यार्थ्यांशी संबंध जोडणे यांसारख्या गुणांचा समावेश होतो हे गुण बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांन मध्ये आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी सदरील संशोधन महत्वाचे आहे.

### नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी, बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांनी खालील गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे : -

- **सकारात्मक दृष्टिकोन:**
  सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्याने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि ते अधिक उत्साहाने शिकण्यास प्रवृत्त होतात.
- **प्रभावी संवाद:**
  प्रभावी संवादामुळे विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करणे, त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आणि त्यांच्या भावना समजून घेणे सोपे होते.
- **सहानुभूती:**
  सहानुभूती म्हणजे विद्यार्थ्यांच्या भावना आणि गरजा समजून घेणे. यामुळे विद्यार्थ्यांशी भावनिक संबंध जोडण्यास मदत होते.
- **निर्णय घेण्याची क्षमता:**
  शिक्षकांनी योग्य वेळी आणि योग्य निर्णय घेणे आवश्यक आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांचे हित जपले जाईल.
- **प्रेरणा:**
  शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे.

- **जबाबदारी:**
  शिक्षकांनी आपल्या कामासाठी आणि विद्यार्थ्यांसाठी जबाबदार असणे आवश्यक आहे.
- **धैर्य:**
  शिक्षकांनी नवीन गोष्टी शिकण्यास आणि प्रयोग करण्यास तयार असले पाहिजे.
- **समस्या सोडवण्याची क्षमता:**
  विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी शिक्षकांनी तयार असले पाहिजे.

## उद्दिष्ट्ये :-

1. बी.एड.च्या. प्रशिक्षणार्थ्यांमधील नेतृत्व गुणांचाअभ्यास करणे.
2. बी.एड.च्या मुली प्रशिक्षणार्थ्यांमधील नेतृत्व गुणांचाअभ्यास करणे.
3. बी.एड.च्या मुले प्रशिक्षणार्थ्यांमधील नेतृत्व गुणांचाअभ्यास करणे.

## परिकल्पना :-

1. बी.एड.च्या प्रशिक्षणार्थ्यांमधील नेतृत्व गुणांचा स्तर उच्च आहे
2. बी.एड.च्या मुली प्रशिक्षणार्थ्यांमधील नेतृत्व गुणांचा स्तर उच्च आहे
3. बी.एड.च्या मुले प्रशिक्षणार्थ्यांमधील नेतृत्व गुणांचा स्तर उच्च आहे

## संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :-

1. प्रस्तुत संशोधन हे छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद ) शहरापुरते मर्यादित आहे.
2. प्रस्तुत संशोधन हे केवळ बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांशी संबंधित आहे.
3. प्रस्तुत संशोधन हे बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या नेतृत्व गुणांशीसंबंधितआहे.

## संशोधन पद्धती :-

सदरील संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

## लोकसंख्या:-

छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद ) शहरातील बी.एड. महाविद्यालयातील संपूर्ण प्रशिक्षणार्थ्यांशी हि सदरील संशोधनाची जनसंख्या आहे

## नमुना :-

छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद ) शहरातील ०५ बी.एड.महाविद्यालयातील प्रत्येकी १० मुले प्रशिक्षणार्थी व १० मुली प्रशिक्षणार्थी अश्या एकूण १०० प्रशिक्षणार्थ्यांशी सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवड करण्यात आली.

## माहिती संकलनाचे साधन :-

संबंधित संशोधनासाठी बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांमधील नेतृत्वाची गुणांची तपासणी करण्यासाठी डॉ. हसीन ताज यांची प्रमाति 'लीडरशिप इफेक्टिव्हिटी स्केल' हि चाचणी वापरण्यात आली आहे.

## संशोधनाची कार्यपद्धती :-

सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवडण्यात आलेल्या बी.एड. महाविद्यालयातील संपूर्ण प्रशिक्षणार्थ्यांकडून माहिती संकलनासाठी डॉ. हसीन ताज यांची प्रमाणित 'लीडरशिप इफेक्टिव्हिटी स्केल' हि चाचणी भरून घेण्यात आली व प्राप्त माहितीवर योग्य संख्याशात्रीय साधनांचा वापर करून निष्कर्ष काढण्यात आले.

## प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन –

**सारणी क्रमांक – 01**

**प्राप्तांकांचा विस्तार व नेतृत्व गुणांचा स्तर दर्शवणारी सारणी**

| अं.क्र. | प्राप्तांकांचा विस्तार | नेतृत्व गुणांचा स्तर |
|---|---|---|
| 1 | 5-98 | कमी |
| 2 | 99-197 | साधारण |
| 3 | 198-296 | उच्च |
| 4 | 297-395 | अति उच्च |

**सारणी क्रमांक – 02**

**बी.एड.प्रशिक्षणार्थ्यांच्या नेतृत्व गुणांचे मध्यमान व नेतृत्व गुणांचा स्तर दर्शवणारी सारणी**

| चल | गट | प्रशिक्षणार्थी संख्या | मध्यमान | नेतृत्व गुणांचा स्तर |
|---|---|---|---|---|
| नेतृत्व गुण | बी.एड प्रशिक्षणार्थी ( मुली व मुले ) | 100 | 265.13 | उच्च |
| | बी.एड प्रशिक्षणार्थी ( मुली ) | 50 | 268.93 | उच्च |
| | बी.एड प्रशिक्षणार्थी ( मुले ) | 50 | 261.81 | उच्च |

## परिकल्पना पडताळणी :-

1. **बी.एड. च्या प्रशिक्षणार्थ्यांमधील नेतृत्व गुणांचा स्तर उच्च आहे**
   छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद ) शहरातील बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या नेतृत्व गुणांच्या मध्यमानाच्या अभ्यास केला असता या प्रशिक्षणार्थ्यांचे मध्यमान सारणी क्रमांक ०२ नुसार - २६५.१३ आले ज्याचा स्तर नियम सारणी क्रमांक ०१ नुसार उच्च आहे त्यामुळे संबंधित परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल व हे मान्य करावे लागेल कि, छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद ) शहरातील बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या नेतृत्व गुणांचास्तर उच्च आहे.
2. **बी.एड. च्या मुली प्रशिक्षणार्थ्यांमधील नेतृत्व गुणांचा स्तर उच्च आहे**
   छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद ) शहरातील बी.एड.च्या मुली प्रशिक्षणार्थ्यांच्या नेतृत्व गुणांच्या मध्यमानाच्या अभ्यास केला असता या प्रशिक्षणार्थ्यांचे मध्यमान सारणी क्रमांक ०२ नुसार - २६८.९३ आले ज्याचा स्तर नियम सारणी क्रमांक ०१ नुसार उच्च आहे त्यामुळे संबंधित परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल व हे मान्य करावे लागेल कि, छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद ) शहरातील बी.एड.च्या मुली प्रशिक्षणार्थ्यांच्या नेतृत्व गुणांचास्तर उच्च आहे.
3. **बी.एड. च्या मुले प्रशिक्षणार्थ्यांमधील नेतृत्व गुणांचा स्तर उच्च आहे**
   छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद ) शहरातील बी.एड.च्या मुले प्रशिक्षणार्थ्यांच्या नेतृत्व गुणांच्या मध्यमानाच्या अभ्यास केला असता या प्रशिक्षणार्थ्यांचे मध्यमान सारणी क्रमांक ०२ नुसार - २६१.८१ आले ज्याचा स्तर नियम सारणी क्रमांक ०१ नुसार उच्च आहे त्यामुळे संबंधित परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल व हे मान्य करावे लागेल कि, छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद ) शहरातील बी.एड.च्या मुले प्रशिक्षणार्थ्यांच्या नेतृत्व गुणांचास्तर उच्च आहे.

## निष्कर्ष :-

1. बी.एड.च्या प्रशिक्षणार्थ्यांमधील नेतृत्व गुणांचा स्तर उच्च आहे
2. बी.एड.च्या मुली प्रशिक्षणार्थ्यांमधील नेतृत्व गुणांचा स्तर उच्च आहे
3. बी.एड.च्या मुले प्रशिक्षणार्थ्यांमधील नेतृत्व गुणांचा स्तर उच्च आहे

## संदर्भग्रंथ:-

1. https://positivepsychology.com/positive-leadership/
2. https://kapable.club/blog/leadership/qualities-of-a-good-leader/
3. https://www.verbalhub.com/leadership-and-management-courses.php
4. https://en.wikipedia.org/wiki/Leadership
5. https://www.imd.org/blog/leadership/what-is-leadership-how-is-it-evolving
6. पंडित,बन्सी बिहारी (१९८७), शिक्षणातील संशोधन संख्यात्मक व गुणात्मक, पुणे : नुतन प्रकाशन.
7. मुळे.रा.श. आणि उमाटे, वि.मु. (१९७७), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपूर : साहित्य प्रचार केंद्र सीताबर्डी.
8. कदम.चा.प. (१९९९), शैक्षणिक संख्याशास्त्र (दुसरी आवृत्ती ) पुणे : नुतन प्रकाशन.
9. आगलावे, प्रदीप (२०००), संशोधन पद्धतिशास्त्र व तंत्र नागपूर : विद्या प्रकाशन.
10. भिंताडे,वि.रा. (२००५), शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे : नुतन प्रकाशन.
11. शेटकर,ग.वि. व जोशी, शोभना (२००६), शैक्षणिक मूल्यमापन व कृती संशोधन, औरंगाबाद : मृण्मयी प्रकाशन.
12. घोरमोडे,के.यु. आणि घोरमोडे,कला (२००६ ), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, (प्रथम आवृत्ती ), नागपूर : विद्या प्रकाशन.
13. बरवे, मीनाक्षी आणि कुंडले, सुरेखा ( २००८ ), शैक्षणिक मूल्यमापन संख्याशास्त्र व कृती संशोधन, पुणे : नित्यनुतन प्रकाशन..
14. भांडारकर,के.एम. ( २०१० ), सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणे : नित्यनुतन प्रकाशन.